महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४९२/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk2 @dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

क्रमांक: २/एनजीसी/परमहंस मौनीबाबा एनओसी /२०२४/ ९३४ दिनांक : 12 MAR 2024

प्रति,

मा. प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन
उच्च व तत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई ४०० ०३२

विषय : परमहंस रामकृष्ण मौनीबाबा एज्युकेशन सोसायटी संस्थेच्या राज्य शासनाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्रासंबंधी

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक E File No.६२३५१९/HTED-२०२३/MHT/TE-५, दिनांक ९.२.२०२४

महोदय,

वरील विषयाबाबत सादर करण्यात येते की, परमहंस रामकृष्ण मौनीबाबा एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेस राज्य शासनाने दिलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करणेबाबत श्री शैलेश गोंधने यांनी मा.उपमुख्यमंत्रीमहोदयांकडे निवेदन सादर केले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने तात्काळ तपासून कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्यानुसार संदर्भाधीन शासन पत्रान्वये वरील विषयाबाबत आवश्यक कागदपत्रांची सखोल पडताळणी करुन स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्यास कळविले होते.

संचालनालयाने पत्र क्रमांक २/एनजीसी/मौनीबाबा/२०२४ दिनांक ९.२.२०२४ रोजी विभागीय कार्यालय अमरावती यांना उपरोक्त संस्थेने शासनास ना हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना शासनास सादर केलेली कागदपत्रे व चौकशी समितीच्या अहवालातील कागदपत्रे यांची सखोल पडताळणी करावी. तसेच संस्थेला खुलासा सादर करण्याची संधी देऊन शासनातर्फे देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करण्यास कळविले होते. त्यानुसार विभागीय कार्यालय अमरावती यांनी चौकशी समिती नियुक्ती करुन संस्था तसेच तक्रारदार श्री गोंधने यांना चौकशीस बोलावून समितीचा अहवाल दिनांक ६.३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये चौकशी अहवाल संचालनालयास सादर केला आहे. चौकशी समितीचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१. सोसायटीचे अध्यक्ष यांच्या निवेदनावरून पीसीआय या शिखर संस्थेने दिनांक ७.१२.२०२३,१.२.२०२४ व २.२.२०२४ रोजी स्वतंत्र तीन समित्यांद्वारे आकस्मिक तपासणी पध्दतीनुसार संस्था संचालित फार्मसी महाविद्यालयांची तपासणी केलेली आहे.

२. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीत नमूद मुद्दयांसंदर्भात यापूर्वीच संबंधित संस्थेची राज्य शासनामार्फत व तंत्रशिक्षण विभागाद्वारे गठित चौकशी समितीने चौकशी केलेली आहे.

३. पीसीआय व एआयसीटीई या शिखर संस्थांकडे परमहंस रामकृष्ण मौनीबाबा एज्युकेशन सोसायटी या संस्थेने कागदपत्रे सादर केलेली आहेत. तसेच संस्थेने शासनाकडे दाखल केलेल्या प्रस्तावातील दस्तऐवजाची सत्यता व तपासणी झालयानंतरच संस्थेस मान्यता प्राप्त झालेली असल्यामुळे आता सोसायटीची कोणतीही कागदपत्रे देण्याची आवश्यकता नसल्याचे सोसायटीचे अध्यक्ष व प्राचार्य यांनी निवेदनात नमूद केले आहे.

४. तक्रारकर्ता श्री गोंधने यांनी त्यांच्या मूळ तक्रारीसोबत सोसायटीची संस्था सुरू करतेवेळीची खोटी कागदपत्रे शासनास सादर केल्याचे नमूद केलेले आहे व त्या समर्थनार्थ त्यांनी तहसिलदार, चिखली, जि.बुलढाणा, नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांची पत्रे तसेच उपसचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग ,मंत्रालय यांनी पीसीआय ,नवी दिल्ली यांना उद्देशून लिहिलेले पत्र उपलब्ध करुन दिलेत.

❖ चौकशी समितीची शिफारस :

सर्व बाबींचा सर्वकष विचार केला असता आणि तक्रारदार श्री शैलेश गोंधने यांनी समितीस दिनांक २७.२.२०२४ रोजी पाठविलेल्या ई मेल सोबतचे तहसिलदार,चिखली यांचे दिनांक २७.७.२०२२ व नायब तहसिलदार,उपविभागीय अधिकारी कार्यालय बुलढाणा यांचे दिनांक २८.७.२०२२ रोजीचे दोन्ही श्री गोंधने यांचे नावे निर्गमित झालेल्या पत्रांच्या छायांकित प्रतींवरुन परमहंस रामकृष्ण मौनीबाबा एज्युकेशन सोसायटी यांचे द्वारे संचालित शैक्षणिक संस्थांना (कर्मयोगी तात्यासाहेब बोंद्रे इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी,चिखली जि.बुलढाणा स्थापना वर्ष २०१९ ही संस्था वगळून) सन २०१० पर्यंत जमीन अकृषक आदेश व बांधकाम परवानगी तसेच बांधकाम आराखडयास मंजुरी प्रदान केली नसल्याबाबत नमुद केलेले आहे. तसेच सोसायटीद्वारे संचालित संस्थांना संधी दिली असता, त्यांनी आवश्यक कागदपत्रे या समितीस दाखविली नाही. यावरुन सोसायटीद्वारे संचालित चार शैक्षणिक संस्थांना जमीन अकृषक आदेश व बांधकाम परवानगी तसेच बांधकाम आराखडयास सक्षम प्राधिकरणांची मंजूरी/ परवानगी सन २०१० पर्यंत देण्यात आलेली नसल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते. तरी प्रस्तुत प्रकरणी सोसायटी ,द्वारे संचालित चार शैक्षणिक संस्थांना निर्गमित झालेल्या ना-हरकत प्रमाणपत्रांबाबतची पुढील नियमोचित कार्यवाही ही राज्य शासन स्तरावर करण्याची समिती शिफारस करीत आहे.

विभागीय कार्यालयाने नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

- परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्था चिखली यांचे मालकीचे मौजे सावरगाव डुकरे शिवारातील गट क्रमांक ११७,१२१,१३१,१३३,१४० व १४१ मधील जमीन मा.उपविभागीय अधिकारी बुलढाणा या कार्यालयाच्या अभिलेख्यानुसार त्यांचेमार्फत सदर संस्थेची जमीन सन २०१० पर्यंत अकृषक करण्यात आलेली नाही. तसेच सन २०१० पर्यंत संस्थांची बांधकाम परवानगी तसेच मंजूरी देण्यात आलेली नाही.
- परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्था चिखली या संस्थेच्या अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालय चिखली (१९९३), अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी चिखली(१९९४) अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी चिखली (१९९५),अनुराधा तंत्रनिकेतन चिखली,(२०१०) या संस्थां स्थापन करतेवेळी जमिनीचे अकृषक प्रमाणपत्र,बांधकाम परवानगी,जमीन वापरण्याची परवानगी,बांधकाम पूर्णत्वाचा दाखला,भोगवटा प्रमाणपत्र इ.कागदपत्रे नव्हती.

- समितीच्या निष्कर्षानुसार संस्थेची पीसीआय या शिखर परिषदेद्वारे श्री.शैलेश गोंधणे यांनी उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांचे कार्यालयाकडून माहिती प्राप्त करुन ती सादर केली. त्यानुसार परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्था चिखली या संस्थेची जमीन २०१० पर्यंत अकृषक करण्यात आलेली नाही. तसेच शैक्षणिक प्रयोजनार्थ अकृषक आदेश १८.३.२०२० आणि ८.९.२०२१ रोजी निर्गमित केला आहे. प्रचलित पध्दतीनुसार अकृषक परवाना मिळाल्यानंतर बांधकाम परवानगी तसेच बांधकाम आराखडयास मंजुरी देण्यात येते व बांधकाम पूर्ण झाल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते. प्रचलित पध्दत विचारात घेता संस्थेकडे बांधकाम परवाना असल्यास तसेच भोगवटा प्रमाणपत्र असल्यास ते शैक्षणिक वर्ष २०२१ नंतरचेच असू शकते.
- उपरोक्त संस्था या १९९३ ते पुढील कालावधीच्या आहेत. त्यामुळे त्या काळापासून आजतागायत या संस्थेतून अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र पदवी , पदविका अभ्यासक्रम शिकून अनेक बॅचेसमधील विद्यार्थी उत्तीर्ण होऊन गेले आहेत. त्यामुळे आता या टप्प्यावर संस्थेस दिलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द केल्यास त्या निर्णयाचा त्या संस्थेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास बाधा पोहोचेल असे वाटते.
- परमहंस रामकृष्ण मौनीबाबा एज्युकेशन सोसायटी यांचे द्वारे संचालित शैक्षणिक संस्थांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची संधी देऊनही त्यांनी समितीला ती कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यामुळे संस्थेकडे सदर कागदपत्रे आहेत किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होते.

उपरोक्त बाबी विचारात घेता, परमहंस रामकृष्ण मौनीबाबा एज्युकेशन सोसायटीच्या अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालय चिखली (१९९३), अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी चिखली(१९९४) अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी चिखली (१९९५),अनुराधा तंत्रनिकेतन चिखली,(२०१०) या संस्थांची कागदपत्रे संस्थेने समितीस सादर केली नसल्यामुळे सदर संस्थांना कागदपत्रांची पडताळणी केल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता मुदतवाढ देण्यात येऊ नये असे शिखर संस्थांना कळविण्यात यावे. तसेच कागदपत्रांची सखोल व काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच त्या शैक्षणिक संस्थांना व त्या संस्थेतील अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता व तदनंतर मुदतवाढ देण्याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया या शिखर संस्थांना त्यांच्या स्तरावरुन निर्णय घेण्यास्तव शासनामार्फत कळविणे उचित राहिल.

तरी, परमहंस रामकृष्ण मौनीबाबा एज्युकेशन सोसायटी यांचेव्दारे संचलित शैक्षणिक संस्थाबाबत शासन स्तरावर उचित निर्णय घेऊन त्यानुसार संबंधित शिखर संस्थांना शासन स्तरावरून प्रस्तावित करण्यात यावे, हि विनंती.

आपला,

( डॉ.विनोद मोहितकर )
संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई